

हर्षज पाटकर

इरावती पाटकर


# क्लिक ४

# क्लिक-4

हर्षज पाटकर
इरावती पाटकर

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव  : क्लिक-4
छायाचित्रकार : हर्षज पाटकर
लेखन, शब्दांकन : हर्षज पाटकर, इरावती पाटकर
iraharsh@gmail. com
Website:- www. touchthroughlens. com
https://www. facebook. com/Touchthroughlens



(ह्यात फोटोग्राफी संदर्भातील काही शब्दांचा वापर मुद्दाम इंग्रजी ठेवला आहे आणि सोबत त्याचा मराठी अर्थही जोडला आहे. कारण तुम्ही ह्या संदर्भात प्रयोग करत असताना तुम्हाला इंग्रजी शब्दांमुळे माहिती मिळवणे सोपे होईल. )

या पुस्तकातील छायाचित्रांचे व  लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान <esahity@gmail. com>
प्रकाशन  : 3 April 2015
©esahity Pratishthan® 2015
www. esahity. com

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे पुस्तक इतर वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त याचा इतर कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

हे पुस्तक आमचे मनोमन गुरू

श्री नॅशनल जिओग्राफ़िक गुरुजी

यांचे चरणी

मनोभावे अर्पण

हर्षज

इरावती

Click 4

कायदा! कायदा! कायदा!

हो हो फोटोग्राफीसाठीही काही कायदे असतातच ....

तसे तर कुठल्याही गोष्टीच्या पूर्तीसाठी कायदे, नियम,संकेत हे असतातच. पण अर्थातच आपण आधी ते शिकून घेऊन त्यात प्राविण्य मिळवलं की वेळ प्रसंगी तेच नियम तुम्ही वाकवूही शकता. त्यामुळेच फोटोग्राफीसाठीही काही नियम कायदे हे असणारच हे तर गृहीतच आहे. आणि तुम्ही एक्स्पर्ट झाल्यावर त्यांच्या पलिकडे जाऊ शकता. पण मुळात ते माहिती असणे आवश्यक आहे.

तसे तर फोटोग्राफीचे आणि चित्रकारांचे नियम हे बहुतांशी सारखेच असतात आणि ते वर्षानुवर्षे तसेच पाळलेही जातात. आता तर तुम्ही विचारात पडला असाल की काय बाबा असे काय नियम आहेत आणि आपण कसे ते पाळायचे. .

हो ना?

अहो विचार कसला करताय? अतिशय सोपं आहे की ... नियम इतकाच की कसलाही विचार डोक्यात न आणता; हातात कॅमरा घ्यायचा ... आणि जे दिसेल मिळेल त्याचा फक्त फोटो काढत सुटायचे .... बस इतकंच ... आता तुम्ही विचारात पडला असणार की "हा काय नियम आहे का ... हे तर आम्हालाही माहित होते ..." बरोबर ना ... मग करा की सुरूवात .... अहो हातात लहानपणी दगडी पेन्सिल पकडून हजारो वेळा गिरवलेला "श्री" आता फाऊंटन पेनने गिरवताना येतो की नाही सुबक आणि रेखीव. मग काय तसंच गणित आहे हे ... तर बघा बरं सोडवून.

हे पुस्तक म्हणजे या नियमांची नुसती झलक आहे. हे पुस्तक वाचल्यावर तुम्ही या विषयावरची पुस्तके मिळवून वाचावी. मराठीत अशी खुप छान पुस्तके आहेत. हौशी लोकांना फ़ोटोग्राफ़ी शिकवणाऱ्या संस्थाही आहेत. हे पुस्तक म्हणजे या दुनियेच्या दरवाज्याचं की होल आहे असं समजा.

## Compositional Rules

क्लिकच्या आधीच्या भागांत आपण प्रकाशयोजना, शटरस्पीड, आदी टेक्नीकल बाबी पाहिल्या. पुढेही त्या पहाणार आहोतच. आता या भागात आपण फ़ोटोची कलात्मकता पहाणार आहोत. **Composition** वरून_छायाचित्रकारातला कलाकार कोण आणि नुसताच कुशल छायाचित्रकार कोण ते कळून येते. जसा भाषेतला एखादा विद्वान हा चांगला लेखक किंवा कवी होईलच असे नसते तसेच कॅमेराची सर्व तंत्रं माहिती असलेला किंवा असलेली व्यक्ती चांगली कलाकार होईलच असे नसते. यात अत्यंत महत्त्वाचा भाग येतो तो **Composition** चा.

आत्तापर्यंत तुम्ही बरेचदा ऐकलं असेल की फोटोग्राफी साठी कॉम्पोजिशन असतात. आता हे composition (रचना) प्रकरण कसं बरे शोधायचं ...

कॉम्पोजिशन म्हणजे तुम्ही जेव्हा फोटो काढता त्यात तुम्ही जे element म्हणजे घटक निवडता आणि त्यांना अश्या प्रकारे मांडून दाखवता ते झाले कॉम्पोजिशन. मांडणी. म्हणजे थोडक्यात एक झाड आहे एका पार्कमध्ये. तर ते पार्कमधील झाड तुम्ही कुठल्या अँगलने शूट कराल त्यावरून तुमच्या मनातले त्याचे प्रतिबिंब किंवा रचना दिसून येते. यात खालील १६ गोष्टी येतात...

1. The rule of thirds
2. Rule of Odds
3. Leaving Space
4. Fill the Frame
5. Simplification
6. Balance
7. Lines
8. Patterns
9. Colors
10. Texture

11. Symmetry
12. Viewpoint
13. Background
14. Depth
15. Framing
16. Orientation


जे ना देखे रवी ते देखे कवी तसंच जे फोटोग्राफरच्या मनात आहे ते त्यासाठी त्याने जे अँगल निवडणे, ते सादर करून आणणे म्हणजेच कॉम्पोजिशन. आता उगिचच्या उगीच वस्तूंची गर्दी फोटोतून न दाखवता अतिशय सुटसुटीत मांडणं म्हणजे सादरीकरण. किंवा जिथे गर्दी हाच महत्त्वाचा फ़ॅक्टर आहे तिथे ती व्यक्ती गर्दीत पण तरीही एकटी दाखवणं म्हणजे सादरीकरण.

आता फोटो कसा काढला तर तो जास्त उठून दिसेल, अधिक खुलून येईल ह्यावर फोटोग्राफरचे कौशल्य असते. पण तुम्हीही प्रयत्नपूर्वक हे बदल स्वतःमध्ये करून शिकू शकता. तसे तर ज्यालाही कॅमेरा हातात पकडता येतो त्या प्रत्येकाला फोटो कसा काढायचा ह्याचे बेसिक नियम तर माहितच असतात की ... शिवाय काही गोष्टी उपजत असतात. आणि काही व्यक्तींकडे प्रतिभा असते. फ़क्त थोड्या उजळणीची गरज आहे. म्हणूनच आपण काही गोष्टींची परत उजळणी करून घेऊया.

# The rule of thirds

एक अत्यंत महत्वाचा नियम "रूल ऑफ थर्ड्स"; कुठल्याही फोटोग्राफी करणाऱ्या माणसाला माहित असणे आवश्यक असा हा नियम. आणि फक्त फोटोग्राफर्सच कशाला तुम्ही अनेक चित्रपट छायाचित्रकार, डाइरेक्टर ह्यांनाही चित्रपट शूट करीत असतांना हा नियम वापरतांना पहाल. म्हणजे अगदी आधी तुमच्या लक्षात नसेल आले तरी आता तुम्ही आवर्जून हे निरीक्षण करून बघा. आता हे करण्याचे काय कारण असावं बरं ...

Grid



कारण इतकंच की इमेज मधोमध कॅप्चर न करता वन थर्ड मध्ये कॅप्चर केली तर ती अधिक चांगली खुलून येते. बघतानाही जास्त आकर्षक वाटते तुलनेने मध्यभागी ठेऊन घेतलेल्या इमेजपेक्षा .... पुर्वी तरी हे सगळे समजायला आणि त्याहून वापरायला कठीणच असायचे ... पण विज्ञानाच्या बाबांचे आभारच मानले पाहिजेत की आपल्यासाठी इतक्या सहज सुविधा उपलब्ध करून देत आहेत ते .... गम्मत सोडा पण खरोखरच हल्लीच्या कॅमेरा मध्ये view finder मधून बघतांना “Grid” हा एक पर्याय उपलब्ध आहे. ह्या ग्रिड ला दोन उभ्या दोन आडव्या रेषांनी चौकट केलेली असते. म्हणजे थोडक्यात आपण लहानपणी फुल्ली गोळा खेळतांना कश्या रेषा आखायचो अगदी तसंच काहीसं....




आता हाच वरचा फोटो बघा नं ... पहाटेचा उत्तम अनुभव आपल्याला हा फोटो देतो. मस्त पहाटेचा एक लालिमा ह्या आकाशात जणू उधळला गेलाय आणि त्याच्या त्या छटांमधून बरसणारा अहिर भैरवाचा तो कोमल रिषभ त्या क्षितिजावर ओढावा तशी ती विंडमिलची माळ पसरलीय. त्यातही ती फोटोच्या वन थर्ड भागात आल्याने त्याचं एक सौंदर्य आपल्याला जास्त भावतं... आता अजून एक उदाहरण बघा ... जागा तीच फक्त फोटोचा ॲंगल बदललाय ... आणि फोटोतला फरक पहा ... आता तीच जागा, वेळ, असूनही आपल्याला फोटो भावात नाही. कारण ह्यामधे रूल ऑफ थड्र्सचा वापर नाही.



रूल ऑफ थड्र्स अजून चांगल्या प्रकारे आपण समजून घेऊया. जिथे ह्या ग्रिडच्या रेषा एकमेकांना छेदतात (इंटरसेक्ट) त्याला इंट्रेस्ट पॉइंट म्हणतात. आता तुम्ही म्हणाल की अरे आम्ही ज्यावेळी कॅमेरा घेतला त्यावेळी हा ग्रिड ऑप्शन उपलब्ध नव्हता ...

नेमका आम्ही घेतल्यानंतरच्या कॅमेरामध्ये हा ऑप्शन आला ... आता काय करू परत ग्रिड साठी नवा कॅमेरा घेऊ की काय ... ?

घाबरू नका ... असं काही करायची गरज नाही. तर तुम्ही मनातल्या मनात त्या रेषा आखून असे समजून चला की ह्या रेषा जणू तिथे आहेतच. आता बघा नेहमी एखाद्या माणसाचा फोटो काढत असतांना त्याला थोडे उजवीकडे किंवा डावीकडे फ्रेम मध्ये कॅप्चर करायचा प्रयत्न करा म्हणजे अगदी मधोमध न कॅप्चर करता कुठल्यातरी एका साइडला ठेवा. बस्स!






## Rule of Odds

Photo 2

आता तसे बघता रूल ऑफ ऑड्स हा थोड्याफार फरकाने रूल ऑफ थर्ड्स सारखाच नियम आहे. म्हणजे असे की निसर्ग फोटो काढत असतांना समसंख्या कॅप्चर न करता विषम संख्या कॅप्चर करणं. हे डोळ्याना बघतांनाही जास्त आकर्षित दिसतं. थोडा गोंधळ उडाला असेल बहुदा तुमचा तर मी अजून सोप्पं करून सांगायचा प्रयत्न करतो. म्हणजे कधी आपल्याला तारेवर बसलेले पक्षी दिसतात तेव्हा ते सम आकड्यात असतील म्हणजे दोन किंवा चार असतील त्यापेक्षा ते तीन किंवा पाच, सात बसले असतील तर ते कॅप्चर केल्यावर अधिक आकर्षक फोटो मिळतो. आता ह्याचे कारण शोधायला गेलात तर इतकच की मनुष्य प्रवृत्ती समूहामध्ये मध्यस्थान शोधतो. जर एखादा मधलाच पक्षी उडाला तर त्या फोटोची रंगत नक्कीच कमी होते. आता तुम्ही काढलेला फोटो बघतांना लोकांचे लक्ष्य त्या फोटोच्या विषयाकडे जायला हवे ना की त्या फोटोतील रिकाम्या जागेकडे ... बरोबर ना?

ह्या वरच्या फोटोमध्ये तुम्हाला टेराकोटाच्या कंदीलांची रांग दिसतेय ... आता हेच जर का मी दोन किंवा चार कंदील एका रांगेत ठेऊन फोटो काढला असता तर तो फोटो डोळयाला तितकासा कॅची झाला नसता पण हेच विषम संख्येचा (३,५,७) वापर केल्याने फोटोमध्ये एक प्रकारची नाट्यमयता येते ...

त्यासाठी एक सम संख्येच्या फोटोचे उदाहारण देतो म्हणजे हा मुद्दा निट लक्षात येईल.



## Leaving Space

आता हाच नियम बघा ना ह्यातून दोन कल्पना जुळून आलेल्या दिसतात: ब्रीदिंग रूम अँड इंप्लाइड मुव्हमेंट.

लीविंग स्पेस हा नियम नैसर्गिकरीत्या प्रत्येकाच्या अंगात असतोच त्यामुळे तो वेगळा जाऊन शिकायची गरज नाही पण तरीही हा नियम काय हे जाणून घ्यायचे असेल तर अशी कल्पना करा की तुमची फ्रेम हा एक बॉक्स आहे आणि तुम्ही फोटो काढण्यासाठी निवडत असलेला सब्जेक्ट म्हणजे जणूकाही तुम्ही त्या बॉक्स मधे भरत असलेली एक वस्तू आहे. आता तुमच्या त्या सब्जेक्टला छान ऐसपैस जागा त्या बॉक्समधे मिळावी असे वाटत असेल तर तुम्ही बॉक्स मोठा घेणार बरोबर ना ... तसाच तुमचा सब्जेक्ट जर तुमच्या फ्रेममधे मावत नसेल तर तुम्ही अर्थातच फ्रेम मोठी घेणार.

आता सांगा हा एक फोटोग्राफी मध्ये असलेला नियम मला तुम्हाला सांगायची गरज तरी आहे का ... हा तर नियम तुम्हाला उपजतच प्रत्येकाला माहित असतोच ... आहे की नाही सोप्पं... आणि जर फ्रेम मधे सब्जेक्ट पकडतांना तो थोडा ऑफ कॅमेरा होत असेल तर लक्षात ठेवा की सब्जेक्टच्या आजुबाजूला नेहमीच एक “white space” असते.

आता व्हाइट स्पेस म्हणजे अगदी शब्दशः अर्थ पकडू नका तर वाईड स्पेस म्हणजे सब्जेक्टच्या आजुबाजूला असलेली रिकामी जागा जी तुमच्या फ्रेम मध्ये तर असते पण त्याचा आपण काही वापर करत नसतो अशी निरुपयोगी जागा. काही ठिकाणि यालाच Negative space असेही म्हणतात.

तसाच “Implied Motion” म्हणजे जर तुमचा सब्जेक्ट हलता असेल तर तुम्हाला आजुबाजूला थोडी मोकळी जागा ठेवावी लागते जेणेकरून तो सब्जेक्ट स्थिर न दिसता हलता आहे हे डोळयाला लगेच जाणवेल.




फोटो 3a –

आता हाच फोटो बघा ना ह्या मुलीच्यापुढे मुद्दाम ही व्हाईट स्पेस ठेवायचा विचार मी केला कारण त्यामुळे ती मुलगी काही विचार करतेय अशा प्रकारचे फीलिंग येतय.




आता फोटो 3b बघा.

ह्यात फोटो अश्या प्रकारे घेतलाय की मुलगी उजव्या साइडच्या कोपऱ्यात ठेऊन फोटोची फ्रेम घ्यायचा प्रयत्न केलाय. पण त्यातून एक अपूर्ण आणि चुकचुकल्यासारखे फीलिंग आहे... उगीचच एक प्रश्नांची माळ आपल्या डोक्यात घूमायला लागते. काय बरे विचार करतेय ही मुलगी ... अशी एकटक पाण्याकडे काय शोधतेय ... अशा वेळी मला अरविंद गोखले ह्यांची कातरवेळ ही कथा आठवली. एक प्रकारची अर्धवट अतृप्त भावना हा फोटो सांगून जातोय.




आता फोटो 3c–

आता हा ड्रॅगन बोटचा फोटो बघा ना ... ह्यात ड्रॅगन बोट बरोब्बर मध्यभागी असून क्रियात्मक आहे तरीही फोटो बघतांना मात्र ती शांत थांबलेली वाटतेय


आणि फोटो 3d




मधे मात्र संपूर्ण ड्रॅगन बोट मी फ्रेममध्ये न घेता काहीच भाग घ्यायचा प्रयत्न केलाय. पण त्यातून एक फिलिंग येते की ड्रॅगन बोट पुढे सरकत त्या रिकाम्या जागेकडे जात असल्याचा एक आभास ह्या फ्रेममधे होतो; की जणू काही ह्या फ्रेमच्याही पुढे काहीतरी मोठी रेस वैगेरे चालू असावी आणि तिथे ही बोट निघाली असावी. मुद्दामच ती बोट डावीकडून उजवीकडे जाताना कॅप्चर केलीय. कारण आपण सुद्धा लिहिणं वाचणं अशा क्रिया डावीकडून उजवीकडे करत असतो.

## Fill the Frame

Photo 4a




रूल ऑफ फ्रेम

हा ही एक महत्वाचा नियम फोटोग्राफरने गाठीशी बांधायचा. तुम्ही फोटो काढताना आधीच फ्रेमचा काल्पनिक विचार करून घ्यायचा. पुर्वी नाही का चित्रपटात दाखवायचे ते स्वतःला डाइरेक्टर आहे असे दाखवणे लोक हाताने अशी फ्रेम दाखवायचे आणि म्हणायचे की "आरे आपका चेहरा तो बिलकुल हीरो मटेरियल हे ... आप मुझे आके मिलिये मे आपकी लाइफ बना दूँगा ...

गमतीचा भाग सोडा पण त्यातली हाताने फ्रेम पकडायची कल्पना तुम्ही इथे वापरू शकता अगदी खऱ्याखुऱ्या फोटोग्राफीसाठी. अश्या फ्रेमचा काल्पनिक विचार करतांना तुम्हाला सब्जेक्ट बरोबर काय फोटोत असावे असे वाटते त्याचा विचार करा ... उगीच जास्तीत जास्त फोटोत वस्तू घुसवून फोटोची क्वालिटी का खराब करा ... नाही का? ....




आता उदाहरण द्यायचे झाले तर ह्याच फोटोतल्या बाई बघा ना ... किती छान भाव आहेत नाही ह्या चेहऱ्यावर ... अश्या ह्या सुंदर फोटोला एक मस्त फ्रेम असती तर हा फोटो किती खुलून आला असता नाही का ... पण तुम्हाला गजबजलेल्या दुकानात ह्या बाई दाखवायच्या आहेत त्यामुळे तसे बघता ह्या फोटोपुरती त्या फ्रेमची तितकीशी गरज वाटत नाही आपल्याला. म्हणजेच थोडक्यात काय जर ह्या गजबजत्या दुकानाशिवाय ह्या बाई असत्या तर कदाचित फ्रेम टाकून आपण फोटोला अधिक सुंदर केले असते पण त्या गजबजलेल्या दुकानाने बाईंच्या चेहऱ्यावरील भावांचा एक वेगळाच अर्थ मांडलाय की ... आणि आपल्यापर्यंत तो पोहोचलाय की मग कशाला उगीच जास्तीचा आटापिटा .... नाही का?

## Simplification




Photo 5

सर्वसाधारणपणे बघायला गेले तर साध्या प्रतिमा ह्या मनाला जास्त लवकर भावतात तुलनेने किचकट विषयापेक्षा हे नक्कीच ... ही कल्पना तसे पाहता आधीच्या नियमाच्याच पंक्तीत बसणारी आहे ती म्हणजे “fill the frame”. आता तसे बघायला गेले तर हे नियम वेगवेगळे पण किती प्रमाणात एकमेकात गुंतलेले ...

आता हा नियम वापरताना फ्रेम मध्यी काय काय आहे ते पहा आणि स्वतःला आधी एक प्रश्न जरूर विचारा की ह्या घटकाला जर मी माझ्या फोटोत ठेवले तर त्याने माझ्या फोटोमधे काही विशेष फरक पडेल का? आणि तसा जर फरक नसेल तर सरळ त्याला उडवा... फ़ोटो जितका सिंपल तितका चांगला. पण बावर्ची मधला राजेश खन्ना सांगतो ना “बिइंग सिंपल इज व्हेरी डिफ़िकल्ट”. फ़ोटोग्राफ़ीत किंवा आयुष्यात.

उगीच कशाला हवीय गर्दी त्या एवढ्याशा फोटोमध्ये … नाही का … त्याशिवाय तुम्ही परत नव्याने फोटोचा विचार करून एक वेगळे कॉंपोझिशनही मांडू शकता … म्हणजे एकतर तुम्ही तुमचा मुख्य सब्जेक्ट झूम करून टाकू शकता किंवा अपेरचेर वाइड ठेऊन फोटोमध्ये बदल करू शकता … आणि ह्यातले काहीच जमले नाही तर सरळ पोस्ट प्रोसेसिंगच्या वेळी क्रॉप करू शकता … हे सर्वात सोपे आहे.

आता ह्या फोटोतून आपल्याला नीट आणि नेमके समजतय की हा फोटो समुद्राच्या वाळूत काढलेला आहे आणि ह्यात मी छोटया बाळाची पावले पकडायचा प्रयत्न केलाय … आता मला ह्या एवढ्या वाळूत बाळाची ती पावले जास्त ठळक दाखवायची होती त्यामुळेच मी ह्या फोटोला साधेपणा देण्याचा प्रयत्न केलाय आणि पावलावर फोकस केलाय.

## Balance




Photo 6

कधी कधी ज्या वेळी तुम्ही रूल ऑफ थर्ड्स वापरत असताना तुम्हाला एक समतोल साधता येणं फार गरजेचं आहे. . म्हणजे तुम्हाला सब्जेक्ट अतिशय ठळकपणे दाखवायचय तर एकतर तो फोटोत अगदी पुढे असू द्या किंवा मग तो थोडा तिरपा ठेऊ शकता आणि कधी कधी तर तुम्हाला आजुबाजूच्या छोट्या ऑब्जेक्ट्सचा पाठीमागे वापर पुरेपूर करून घेता येऊ शकतो ... जेणेकरून आपला मुख्य सब्जेक्ट ठळक उठून येतो. हेच मी ह्या फोटोतून दाखवायचा प्रयत्न केलाय.

आता ह्या टोपलीचा एक साधासा फोटो आहे बघा ... ह्यातून मला मोठी टोपली ठळकपणे दाखवायचीय तर मी छोटया टोपलीचा आधार घेऊन मोठ्या टोपलीला मांडायचा प्रयत्न केलाय.



अजून एक उदाहरण म्हणजे हा अजून एक फोटो बघा ... ह्यामध्ये दोन नौका आहेत .... बरोबर ... आता मला मोठी नौका जर अधोरेखित करायचंय तर मला नक्कीच छोटया नौकेला तिच्या समोर ठेवावे लागेल तरच तुम्हाला मोठी नौका ही ठळक जाणवेल.



अनेकदा एखाद्या वास्तूची किंवा निसर्गाची भव्यता दाखवण्यासाठी त्यात एक दोन छोटी माणसे दाखवणे आवश्यक बनते ते याचसाठी.

## Lines



Photo 7

रूल ऑफ लीडिंग लाइन्स च्या नियमाप्रमाणे आपण सहजच समोर असलेल्या आकाराला आत्मसात करतो. मग ती नागमोडी जाणारी वाट असो किंवा लांबच लांब झाडांची रंग ... ह्या लीडिंग लाइन्स आपल्या मनात एक प्रतिमा तयार करत जातात. आणि तुमच्या फोटोतही अशी एखादी प्रतिमा असेल तर प्रेक्षक तो फोटो बघून मनातल्या मनात एक चित्र निर्मित करतात ... काही कल्पना बांधतात ... त्यामुळे अश्या प्रकारच्या प्रतिमा जास्त पटकन भावतात ज्यात रूल ऑफ लीडिंग लाइन्सचा वापर होतो.

हाच फोटो बघा ना एक ब्रिड्ज जो लांबवर कुठेतरी जाऊन संपतोय आणि पुढे शांत निळसर पाणी आहे. इथे हा रूल ऑफ लीडिंग लाइन्स चा वापर करण्यात आलाय.



ह्या वरच्याच फोटोत हा नियम कसा बसलाय ते पहा ... वाळूत जाणारी नागमोडी पावले कुठेतरी जाऊन संपतात तिथवर ह्या फोटोतून आपली किंवा प्रेक्षकांची नजर शोधत जाते. तिरप्या रेषेत काढलेले ऑब्जेक्ट्स फोटोला एक प्रकारची नाट्यमयता व गती देतात.

**Patterns**




Photo 8

पॅटर्न म्हणजे थोडक्यात सुसंगती. हे तुम्हाला सगळीकडे सापडतात त्यातले काही मनुष्य निर्मित असतात तर काही नैसर्गिक जन्मलेले. जर तुम्हाला रोजच्या आयुष्यात तुमच्याच आजुबाजूला काही सुसंगती सापडत नसेल तर मी म्हणेन की तुम्हाला तुमचा दृष्टीकोन जरा बदलायची गरज आहे. हे जे पॅटर्न्स असतात ना ते इतके सुंदर आपल्या रोजच्या जगात गुंफलेले असतात आणि ते जर का आपल्याला सापडले तर त्यातून एक अनामिक लय मिळत जाते. . आणि अश्या गोष्टीत एक प्रकारची शांतता दडलेली असते बघा ...... आता पॅटर्न म्हणजे काय तर कधी आकाशात एकत्र उडत जाणारा पक्ष्यांचा थवा, समुद्रकिनारी ओहोटीने वाळूत तयार झालेले डिझाइन. . हे सगळे एक प्रकारचे पॅटर्न आहेत.

जसे झाडांवर फ़ुलांची किंवा फ़ळांची किंवा पानांची मांडणी, नारळाच्या झावळया. रस्त्यावरचे डिव्हायडर, हॉटेलमधील चमचे व प्लेटची मांडणी, भाजीवाल्यांची किंवा फ़ळवाल्यांचे ठेले, आईस्क्रिम किंवा कपड्यांच्या दुकानातली शोकेस, बसचा चेहरा, स्ट्रीट लाईट्स, कवायत करणारे पोलिस किंवा विद्यार्थी, रेलवेची वाकून वाकून वाट पहाणारे शेकडो चेहरे, रुळांखालचे स्लिपर्स, पत्ते खेळणाऱ्यांच्या हातातले पंख्यासारखे जुळवलेले पत्ते, पंक्चर काढणाऱ्याकडे रचून ठेवलेले टायर्स. अहो सगळिकडे सौंदर्य असतेच आणि ते पावलोपावली दिसायला हवे. ते ज्याला दिसते तो कलाकार आणि बाकी सगळे जीवनाचा भार वाहणारे हमाल.




आता वरच्या फोटोतच बघा ना की हा छताच्या आतल्या भागाचा वापर करण्यात आलाय ... इथे एखादा दिवा ठेऊन ही जर मी फोटो काढला तर मागच्या बॅकग्राउंडमुळे ते अधिक उठून येईल.




**Color**

Photo 9

कदाचित फोटोग्राफी मध्ये रंग हे एक असे माध्यम आहे ज्याची दुसऱ्या कशाशीच तुलना होणे कठीण आहे. शांत निळा आणि हिरवा हे रंग फोटोत बघतांना आपल्याला एक स्थैर्याचा अनुभव देतात. तसाच लाल आणि पिवळा रंग आनंद, उत्सुकता आणि एकप्रकारची सकारात्मकता देतात. तसाच कित्येकदा संपूर्ण फोटो एकच रंगत ठेऊन म्हणजे थोडक्यात ब्लॅक अँड व्हाईट फोटो मधे एखादा वेगळाच रंग मधेच टाकला तर फोटोला एक वेगळीच झळाळी येते. म्हणजे थोडक्यात काय तर रंगाचा नाट्यमय वापर फोटोमधे बदल घडवून आणतो .... हल्ली तर फोटोशॉपमुळे आपण किती छान बदल फोटोत घडवून आणू शकतो. . तरीही निसर्गात असे किती सुंदर रंग आहेत जे फोटोशॉप मध्येही पकडणे कठीण आहे ... म्हणुनच की काय निसर्गाला खरा कलाकार म्हटलय ते खोटे नाही असे वाटून जाते ...

## Texture

टेक्श्चर म्हणजे वीण. गुंतागुंतीचे बारीक पॅटर्न.

टेक्सचर हा ही एक अविभाज्य भाग मानला जातो फोटोग्राफीचा. अगदी साधे सरळ जरी टेक्सचर असेल आणि नुसते त्या टेक्सचरवर झूम जरी केलेना तरी तुम्हाला एक छानसे थ्री डाइमेन्शनल फोटो मिळाल्याचा भास होईल. जसे एखादे पान, किंवा कपडा, झाडाचा बुंधा, किंवा सुरकुतलेला हात.

आणि अगदी तसाच लॉंग शॉट फोटो घेतानाही केवळ फक्त टेक्सचर बदलले तरी फोटोत फरक दिसू शकतो .... आता उदाहरंणच द्यायचे तर अशी जुनाट दगडी चिर्याचे कुंपण आणि त्यावर पावसाने थोडे शेवाळे जमलेले ... किंवा मस्त पाऊस पडल्यावर श्रावणात झाडांनी नेसलेला हिरवा शालू आणि त्या बॅकग्राउंडला काढलेला साधासा फोटोही खूप काही बोलून जातो की आपल्याशी ....

ही फक्त त्या बॅकग्राउंडला असलेल्या टेक्सचरची किमया नाही का?




Photo 10

मस्त शरद ऋतूत (ऑटम) बदलत जाणारे पानांचे रंग आणि पानगळतीने जमिनीवर पडलेली पाने असे काहीतरी डोळ्यासमोर आणायचा प्रयत्न करून बघा ... चला मीच मदत करतो थोडी ... तो यश चोप्राचा महोब्बते चित्रपट आठवतोय का ... त्यामधे असलेले शरद ऋतुमधील मॅपलचे पडणे. असे मस्त लालसर छटा आलेला पान झाडावरून वारयाने गळून पडतय आणि त्याच झाडाखाली कोणीतरी तरुण म्हणजे शाहरुख खान हो ... मस्त व्हायोलिन वाजवतोय ... आणि कानावर अशी एक सुंदर महोब्बते धून येत असतांना तुम्हाला अश्याच एखाद्या सुंदरश्या टेक्सचरचा फोटो कॅप्चर करायला मिळतोय .... अहाहा ... विचारांनी सुद्धा अशी मस्त वारयाची झुळुक पाठीमागून येऊन अंगावरून दोन तीन मॅपलची पाने सरकून गेल्यासारखे वाटते ना ...

### Symmetry





Photo 11

Symmetrical रचना म्हणजे जर वस्तू मधोमध ठेवून दुभंगली तर जशी ती उजवीकडे असेल तशीच समान डावीकडे दिसेल. म्हणजे थोडक्यात चित्रकलेतली मुक्तहस्तचित्र रचना. आणि अश्या प्रकारचे फोटो काढतांना तुम्ही रूल ऑफ थर्ड्स हा नियम ही वाकवु शकता आणि मधोमध हा फोटो काढू शकता. आता अश्या प्रकारची समतोल रचना तुम्हाला मनुष्यनिर्मित शिल्प किंवा नैसर्गिक वस्तूतही सापडू शकते किंवा निसर्गातही. तसाच अश्या समतोल रचना बघता त्यातल्या तीव्र रेषा आणि गोलाकार अकारांचाही विचार करावा लागतो. फोटोसाठी तुमचा सब्जेक्ट जितका डोळ्यांना सुंदर दिसू शकतो तितकाच तो कॅपचर केल्यावर अधिक सुंदर उठून येऊ शकतो.

आता हा वरचा फोटो बघा मी अकबराच्या दीनन-ए -लाही रचना शिल्पचा एक उत्तम नमुना आहे. त्यावरचे कोरीव काम आणि त्या शिल्पाचा समतोल इतका सुंदर साधला गेलाय की कलाकाराची दाद द्यावीशी वाटते.




**Viewpoint**

Photo 12

व्ह्युपॉइंट हा असा एक घटक आहे की जो फोटोचा मूड एका झटक्यात बदलून टाकतो. त्यासाठी ह्या फोटोचा विचार करूया. ह्या फोटोतला हा मुलगा बघा. फोटोचा अँगल असा वरून घेतल्याने तो एकदम छोटासा वाटतो. पण हाच फोटो जर मी कॅमरा खाली पायाजवळ ठेवून वरती फोटो काढायचा प्रयत्न केला तर तोच मुलगा खूप उंच वाटतो. म्हणजे फक्त व्ह्यू बदलला तर फोटो मध्ये बर्याचअंशी बदल घडून येतो.

तुमचा फोटो काढण्याचा दृष्टीकोन हा तुमच्या ऑब्जेक्ट वॉर अवलंबून असतो. जर तुम्हाला तुमच्या फोटोतून एखाद्या झाडाची भव्यता दाखवायची असेल तर झाडाच्या पार मुळजवळ कॅमरा पकडून वॉर फोटो काढा ... झाड एकदम विशालकाय दिसेल आणि तसेच एखाद्या वस्तूला छोटे दाखवायचे असेल तर वरून फोटो काढा म्हणजे तोच ऑब्जेक्ट फार लहानसा दिसेल करून बघा ... हीच आहे फोटोची किमया ...




Photo 13

## Background

हा एकमेव असा रूल आहे जो बऱ्याचदा चांगल्या चांगल्या फोटोग्राफर्स कडून मोडला जातो. म्हणजे अनेकदा सब्जेक्ट आवडला तर आपल्याला मागच्या बॅकग्राउंडचे भानच रहात नाही आणि आपण पटकन फोटो काढून मोकळे होतो पण मागे बॅकग्राउंडला मोकळी जागा नसेल आणि त्यात काही खटकणारे, चुकीचे, अधिक लक्षवेधी, विषयाला बाधा आणणारे असेल तर फोटो ची मजा येत नाही. उदाहरण द्यायचे तर अनेकदा आपण एखाद्या माणसाचा फोटो काढताना मागे अनेक माणसे येताना चालताना बोलतांना दिसली (आणि त्यातली एखादी व्यक्ती 'जास्तच आकर्षक' असली) तर त्या फोटोच्या मुख्य सब्जेक्टची रंगत कमी होते. मग अश्या वेळी तुम्ही अपेर्चर वाइड ठेऊन मागचे बॅकग्राउंड ब्लर करून टाकू शकता. नाहीतर मग तुम्ही तुमच्या फोटोचा अँगल बदलू शकता.

बॅक्ग्राउंड ही न टाळता येणारी गोष्ट असते. बरेचदा ती आपल्याला हवी तशी निवडणे शक्य नसते. त्यामुळे बॅक्ग्राउंडचा विचार करणं हे सोपं नसतं. बॅकग्राउंड कशी हवी हे तुमच्या फोटोच्या सब्जेक्ट वर ठरते. म्हणजे थोडक्यात फोटो काढतांना तुम्हालाच हा विचार करावा लागतो की तुम्ही जे बॅकग्राउंड वापरलं ते तुमच्या फोटोला अधिक रंगत आणेल की फोटो खराब होईल.

बॅकग्राउंड हवे तसे मिळवण्यासाठी, वेगवेगळया ठिकाणी उभे राहून फ्रेम निवडणे, अंतर वाढवून झूम करून, मागची बाजू ब्लर करून पहाणे, मुख्य विषयावर प्रकाशझोत, फ़ोकस आणि फ़्लॅश यांचा वापर करणं, पोस्ट सेशन मध्ये काम करणं हे सर्व करता येतं.

बरेचदा बॅकग्राउंडच अधिक महत्वाचे असते. जसे ताजमहालासमोर आपल्या व्यक्तीचा फ़ोटो काढणे, किंवा सशाला हातात धरून फ़ोटे काढणे, यात बॅकग्राउंड चांगले ठळक यायला हवे. अशा वेळी ऍपर्चर, शटरस्पीड, व्हाईट स्पेस या गोष्टींचा वापर करावा.




**Depth**

Photo 14

डेप्थ म्हणजे खोली. फ़ोटोला त्रिमितीय (three dimensional) परिमाण मिळवून देणे. त्यात आभास निर्माण करणे.

डेप्थ ही फोटोच्या बॅकग्राउंडवर सब्जेक्ट वर अवलंबून असते. म्हणजेच जर तुम्ही लॅंडस्केप फोटोग्राफी करताय तर तुम्हाला प्रत्येक गोष्ट ठळक दिसून येणे आवश्यक असते. बॅकग्राउंड ठळक उठून येण्याकरता तुम्हाला अपर्चरही वाढवावे लागते. पण हेच पॉर्ट्रेट काढतांना माणसाचा केवळ चेहरा हा फोकस असतो. त्यामुळे अप्रेचर वाढवण्याची गरज नसते.

डेप्थ निर्माण करण्यासाठी line techniques वापरता येतात.

## Framing




Photo 15

फोटोग्राफीच्या नियमांमधील नॅचुरल फ्रेम म्हणजे काही नैसर्गिक वस्तू वैगेरे नाही. तर असे काहीतरी ज्याने फोटो शोभनीय होईल. म्हणजे मग तुम्ही "नॅचरल फ्रेम" म्हणून झाडाच्या पारंब्यांमधून एक दृश्य टिपलत किंवा एखाद्या मस्त जयपुरी दरवाजाच्या फ्रेममधून बाहेरचा देखावा टिपलात की ती झाली नॅचरल फ्रेम. अश्या एखाद्या गोष्टीचा समावेश ठेवून काढलेला फोटो अधिक नाट्यमय दिसतो. बघा प्रयोग करून ... आता मी हा वरचा फोटो कसा घेतलाय बघा ... ट्रेनने कोकणात जातांना अचानक पाऊस पडायला लागला आणि मी गाडीच्या खिडकीतून हा वरचा फोटो टिपला.

असेच फ़ोटो गुहेच्या आतून, खिडकीतून, जाळीतून, दोन इमारतींच्या मधून वगैरे काढता येतात. जनरली यात फ़्रेम डार्क व सब्जेक्ट ब्राईट असेल तर जास्त मजा येते.

## Orientation

बरेचदा नवशिक्या फोटोग्राफेर्स ना फोटो उभा काढायचा मोह अनावर होतो आणि ते आजुबाजूला थोडी मोकळी जागा न सोडता केवळ सब्जेक्ट कॅप्चर करतात. त्याने होतं असं की तुम्हाला एडिटिंगच्या वेळी आजुबाजूला जागा कमी राहिल्याने फोटो क्रॉप करतांना अडचणी येतात … ज्यावेळी फोटो उभा घेणे क्रमप्राप्त असेल तर तो निश्चितच उभा घ्यावा आणि जर आडवा फोटो घेतल्याने त्याचे सौंदर्य जास्त कॅप्चर होत असेल तर निश्चितच आडवा घ्यावा … हे फोटोग्राफरने त्या त्या परिस्थितीनुसार ठरवावे.




Photo 16

## Conclusion

खूबसूरती देखनेवालेके नजरमें होती है. Beauty is in the eyes of beholder.

खरे म्हणायला गेले तर एक उत्तम फोटो कसा असावा हे कोणीच अगदी तंतोतंत समजावू शकत नाही. कारण प्रत्येकाच्या नजरेला जे जसे भावेल त्या प्रमाणे त्याची व्याख्या बदलत जाते ... कधी कधी तर एखादा फ़ारसा विचार न करणाऱ्या फोटोग्राफरलाही एक सुंदरसा फोटो मिळून जातो ... म्हणजे योगायोगानेच का असेना अगदी परिस्थिती अशी अनुकूल उभी राहते की फोटो चांगलाच निघावा ...

ह्या भागात आपण फोटोग्राफी आणि त्यासाठी लागणारे नियम ह्यावर चर्चा केली ... आता कुठलीही गोष्ट नव्याने शिकायची तर त्याचे काही कायदे काही नियम हे तर असतातच ... आणि चौकटी मध्ये बसूनच ते शिकायची एक गम्मत असते बघा. आता नियम म्हटले की आपण नाक तर मुरडतोच ... पण जर का हे नियम नीट समजून उमजून मुरडता आले तर हेच नियम आपले मित्र बनू शकतात ... आपल्याला फोटोग्राफीमध्ये मदतही करू शकतात ....

या पुस्तकात मुद्दमच इंग्रजी शब्द वापरले आहेत. त्यामुळे या विषयांवर इंटरनेटवरून शोधायला बरे पडेल.

अहो ही तर सुरवात आहे अजून तर आपल्याला बरेच किल्ले सर करायचे आहेत ... चला तर मग ... लागा बरे कामाला ...

# वाचकमित्रमैत्रिणीहो

आपले अभिप्राय हवेत.

हर्षज पाटकर हे चांगले छायाचित्रकार आहेत यावर दुमत नाही. त्यांच्या (व इरावती पाटकर यांच्या) लेखनशैलीबद्दल आपलं काय मत आहे? त्यांनी एक संपूर्ण पुस्तक लिहावं का? जर असं पुस्तक बाजारात आलं तर त्याला वाचकांचा प्रतिसाद कसा असेल? तुमचं मत कळवा आणि श्री हर्षज पाटकर आणि ईरावती पाटकर यांचेकडून एक सुंदर भेट मिळवा. एक पुर्ण रेझोल्युशनमधलं छायाचित्र जे तुम्ही डेस्कटॉप बॅकग्राउंड म्हणून वापरू शकाल.

पत्ता : iraharsh@gmail.com

# छायाचित्रकार लेखकांना आवाहन

समर्थ रामदासांनी आपल्याला सांगितलं आहे, की
जे जे आपणांसी ठावे
ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करून सोडावे
सकळ जन

फ़ोटोग्राफ़ी ही खुप कॉम्प्लेक्स कला आहे. एखाद्या चांगल्या फ़ोटोकडे डोळसपणे कसे बघावे हे समजून घ्यावे लागते. आता तर प्रत्येकच जण मोबाईलवरून फ़ोटो काढतो. पण प्रोफ़ेशनल ते प्रोफ़ेशनल. त्याची डेप्थ  व उंची समजून घेता यावी यासाठी आपल्याकडून मदत हवी. आपले निवडक फ़ोटो व त्यावरचे राइट अप आमच्याकडे पाठवा. त्यावर रितसर पुस्तक बनवून आपल्या अधिकारांसह ते प्रसिद्ध करू.

वाचक मित्रांना आवाहन : पुस्तक कसं वाटलं ते कळवा. तुमचे अभिप्राय लाख मोलाचे आहेत.

धन्यवाद
आपले नम्र
टीम ई साहित्य